## आदेश नि. क्र.07 वर

दिनांक २९/०५/२०२६

वादीतर्फे प्रस्तुत अर्ज हा उभयपक्षाने ''जैसे थे परिस्थिती'' ठेवण्याबाबत आदेश पारीत करणेसाठी दाखल केला आहे.

2. प्रतिवादी क्र. 1 यांनी अर्जावर त्यांचे म्हणणे देवून अर्जास विरोध केला. प्रतिवादी क्र. 2 व 3 यांनी दावा मान्य असल्याची पुरसिस दाखल केली.

3. वादीतर्फे विधिज्ञ श्री. मोहसिन मिर्झा यांनी असा युक्तीवाद केला कि, वादीने सदरील दावा हा प्रतिवादी विरुध्द सरसनिरस वाटणी, बक्षीसपत्र बेकायदेशीर असल्याचे जाहिर करुन व मनाई हुकूम मिळण्याकरीता दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. 1 ही तथाकथीत व खोटे बेकायदेशीर बक्षीसपत्राचे आधारे सदर मालमत्ता विल्हेवाट करण्याच्या तयारीत आहे. तसेच वादी यांना अशी माहिती मिळाली की, आज रोजी प्रतिवादी क्र. 1 ही त्रयस्त व्यक्तीसोबत सदर वादमालमत्तेची बोलणी होवून विक्री करणार आहे. त्यामुळे आहे ती परिस्थिती ठेवण्यात यावी अशी विनंती केली.

4. प्रतिवादी तर्फे विधिज्ञ श्री. आय. बी. नौरंगाबादे यांनी असा युक्तीवाद केला की, प्रतिवादी क्र. 1 सदरील मिळकतीचे बक्षीसपत्रा आधारे मालक झाले आहेत. तसेच प्रतिवादी क्र. 1 वादमिळकतीची विक्री व विल्हेवाट करणार नाहीत. त्यामुळे सदरील अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

5. हे कायदेचे प्रस्तापित तत्व आहे की, वादमिळकतीची सध्याची परिस्थिती नेमकी काय आहे व ती दोन्ही बाजुस मान्य असल्याशिवाय ''जैसे थे परिस्थिती'' बाबत आदेश पारीत करु नये.

6. प्रस्तुत दाव्यात प्रतिवादी क्र 1 हे वादमिळकत विकण्याच्या तयारीत असल्याबद्दल वादीचे म्हणणे आहे. त्यामुळे अशा परिस्थितीत व दाव्यातील वाद मिळकतीची गुंतागुंत टाळण्याकरीता ''जैसे थे परिस्थिती'' ठेवण्या बाबतचा

आदेश पारीत करणे योग्य व न्यायोचित होणार आहे. सदरील आदेश पारीत केल्यास प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. करिता खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

जैसे थै परिस्थिती आदेश पुढील तारखेपर्यंत मंजुर करण्यात येतो.

Digitally signed by BALAVIR NARAYAN GODBOLE
Date: 2026.05.29 15:55:22 +0530

ठिकाणः दिग्रस
दिनांक २९/०५/२०२६

**( बा. ना. गोडबोले )**
दिवाणी न्या.क.स्तर, दिग्रस